**विशेष दिवाणी दावा क्र. ४६/२०१५**

स्टेट बँक ऑफ इंडिया

वि.

शंकुतला विजयकुमार व्यवहारे वगैरे

**निशाणी क्र. ८ वर पुढील आदेश**

संचिकेचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुत सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. त्यानंतर प्रतिवादी क्रमांक १ यांनी त्यांचेविरूध्द प्रस्तुत प्रकरण एकतर्फा चालवण्याचा झालेला आदेश रद्द व्हावा असा अर्ज दिला. तो मंजुर झाला आहे. प्रतिवादी क्रमांक १ यांची कैफियत निशाणी क्र. ३४ प्रमाणे रेकॉर्डवर घेण्यात आली आहे. त्यानंतर माझे पूर्वीचे मा. पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र. ३६ प्रमाणे वादमुद्दे निश्चित केलेले आहेत. त्यामुळे आता वादी यांनी अगोदर दिलेला हा साक्षीपुरावा दप्तर दाखल करण्यात येवून वादी यांनी पुन्हा स्वतंत्र साक्षीपुरावा दयावे असा आदेश देणे आवश्यक आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. प्रस्तुत साक्षीदार यांनी दिलेला साक्षीपुरावा दप्तर दाखल करण्यात येत आहे.

२. वादी यांनी प्रकरणात स्वतंत्र साक्षीपुरावा दाखल करावा.

दि. २६/११/२०२१

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर